# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/१८८/११०

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


जा. क्र. मरातंशिमं/का-४०(परीक्षा विभाग)/F०९/२०२४/ २४९ दिनांक – 16 JUL 2024

**महत्त्वाचे परीपत्रक**

प्रति,

**प्राचार्य,**

**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका तसेच वास्तुशास्त्र अभ्यासक्रम राबविणा-या मंडळाशी संलग्नित सर्व संस्था**

विषय – **"I" Scheme अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना ५ व ६ व्या सत्राचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी घेणा-या विद्यार्थ्यांसाठी "OTO Registration" वेळापत्रक...**

संदर्भ – मंडळाचे महत्त्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५१/एकवेळ संधी/ २०२४/४००३, दि. ०४/०७/२०२४

उपरोक्त संदर्भीय महत्त्वाच्या परिपत्रकानुसार "I Scheme" अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ५ व ६ व्या सत्राचे सत्रकर्म पूर्ण करण्यासाठी एक वेळ संधी देण्यात आली आहे.

एक वेळ संधी साठी पात्र असणा-या विद्यार्थ्यांची अभ्यासक्रम निहाय यादी संस्थेच्या Login मध्ये "AY २०२४-२५ OTO Registration" या लिंकद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संस्थेने एक वेळ संधी घेऊ इच्छिणा-या सर्व विद्यार्थ्यांचे Registration ऑनलाईन पध्दतीने खालील वेळापत्रकानुसार करावे.

| अ. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १. | संस्थांनी विहित नमुन्यातील अर्ज, हमीपत्र व शुल्क विद्यार्थ्यांकडून स्विकारून संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध लिंकद्वारे OTO विद्यार्थ्यांचे Registration करणे | दि. १६ ते २४ जुलै, २०२४ |
| २. | विभागीय कार्यालयांनी संस्थेने Confirm केलेल्या OTO विद्यार्थ्यांची एकत्रित यादी, संस्थाप्रमुखांचे विहीत नमुन्यातील हमीपत्र व एकूण शुल्क स्विकारून अंतिमतः विद्यार्थ्यांचे अर्ज Confirm करणे | दि. २५ ते २६ जुलै, २०२४ |

**महत्त्वाच्या सूचनाः**

१. एक वेळ संधी घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांकरीता Registration शुल्क रु. २००/- स्विकारून विद्यार्थ्यांचे Registration विहित कालावधीत करणे आवश्यक आहे. यानंतर कोणत्याही परिस्थितीत सदर सुविधा उपलब्ध करून देता येणार नाही.

२. OTO Online Registration बाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना कळविण्याची जबाबदारी संस्थेची राहील.

३. विभागीय कार्यालयाने निश्चित (Confirm) केलेल्या विद्यार्थ्यांनाच एक वेळ संधी घेऊन सत्रकर्म पूर्ण करता येईल.

४. एक वेळ संधी घेणा-या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण स्विकारणेबाबत-

- एक वेळ संधी घेणा-या Semester Pattern पद्धतीच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे सत्र ५ मधील TH-PA व PR-PA या विषयाचे अंतर्गत गुण हिवाळी परीक्षा – २०२४ च्या प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यानच Non Theory E-marksheet द्वारे संस्थांनी मंडळाकडे सादर करावेत. तसेच सत्र ६ मधील TH-PA व PR-PA या विषयाचे अंतर्गत गुण उन्हाळी परीक्षा – २०२५ च्या प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यानच Non Theory E-marksheet द्वारे संस्थांनी मंडळाकडे सादर करावेत.

- एक वेळ संधी घेणा-या Yearly Pattern पद्धतीच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे तृतीय वर्षातील TH-PA व PR-PA या विषयाचे अंतर्गत गुण उन्हाळी परीक्षा – २०२५ च्या प्रात्यक्षिक परीक्षेदरम्यानच Non Theory E-marksheet द्वारे संस्थांनी मंडळाकडे सादर करावेत.
- वर नमूद परीक्षेव्यतिरिक्त इतर कोणत्याही परीक्षेदरम्यान OTO विद्यार्थ्यांचे अंतर्गत गुण मंडळाकडून स्विकारले जाणार नाहीत.

५. एक वेळ संधीचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांनी मंडळाच्या नियमावलीतील RG-6 नुसार सत्रकर्म पूर्ण न केल्यास अशा विद्यार्थ्यांना Detained/Disallowed करावे व असे विद्यार्थी ज्यावेळेस पुढील वर्षाकरीता प्रवेशास पात्र होतील, त्यावेळेस त्यांनी पुढील वर्षात पुन्हा प्रवेश घेणे बंधनकारक राहील.

६. एक वेळ संधी मिळणा-या विद्यार्थ्यांचे सत्रकर्म पूर्ण करुन घेण्याची व विद्यार्थ्यांचे अर्ज अभिलेखे (Record) ठेवण्याची जबाबदारी संस्थेची राहील. तसेच असे रेकॉर्ड आवश्यकतेनुसार सादर केले जातील, याबाबतचे हमीपत्र संस्थेने देणे आवश्यक आहे.

७. या व्यतिरिक्त मंडळाच्या संदर्भीय परिपत्रकान्वये दिलेल्या अटी लागू राहतील, याची नोंद घ्यावी.

(डॉ. चं. डि. कापसे)
प्र. सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत महितीसाठी:
मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहिती व कार्यवाही साठी:
उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय – मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजी नगर